ISSN2249-894X Impact Factor :3.1402 (UIF) Volume- 5 |Issue- 11 |August - 2016

Review Of Research

# हिंदुत्ववादी राजकीय पक्ष आणि राजकारण

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर,जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).



**प्रस्तावना:**

स्वातंञ्योत्तर काळातील भारतीय राजकारण पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या निधनापर्यंत समाजवादी धोरणाने व धर्मनिरपेक्षवादाने प्रभावीत झाल्याचे जाणवते. स्व. इंदिरा गांधी यांच्या कारकिर्दीत कॉंग्रेस प्रणित राजकारण हे अधिक गुतांगुतीचे व्यक्तीच्या केंद्रस्थानी संक्रमित व केंद्रीत झाल्याचे स्पष्ट दिसते. आणिबाणीच्या कालखडांतील विरोधी सर्व पक्षीय नेत्याची झालेली धरपकड आणि त्यानंतर उदयास आलेला जनता पक्ष, जनता पक्षाचे झालेले विघटन आणि त्यामधुन व त्यानंतर उदयास आलेला पुर्वाश्रमीचा जनसंघीय भा. ज. प. राजकीय प्रक्रियेतील व्यापक घडामोडी आहेत. सत्तेची वाटचाल करत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा राजकीय अविष्कार भा.ज.पाने ज्या हिंदूत्ववादी राजकारणाचा वसा घेतला आणि हिंदूत्ववादाच्या प्रसारामध्ये जी आक्रमक भुमिका स्विकारली. व त्यासाठी त्या पक्षाने जी साधणे स्विकारली तिचा क्रमाने अभ्यास होणे गरजेचे आहे. १९८० नंतर धार्मिक उन्माद अधिक वृध्दींगत करण्याच्या दृष्टिने जी अशुचित साधणाचा व घटनाबाहय मार्गाचा अवलंब केला गेला त्याचे विवेचन आपणास करावे लागेल. भारतीय राजकीय व्यवस्थेत अनुक्रमे ज्या हिंदूत्ववादी विचारसरणीचा प्रभाव वाढत गेला त्याचे स्वरूप काहीसे घटनात्मक मुल्याने छेद देणारे, प्रसंगी अव्हान देणारे ठरलेली आहेत. त्याचा तपशीलवार विचार केला जात असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघ परिवारातील इतर शाखा यांनी चालविलेल्या धार्मिक चळवळी व अंदोलने समजून घ्यावी लागतील त्याचा तपशिल खालीलप्रमाणे मांडता येईल. भारताच्या राजकीय प्रक्रियेमध्ये अनुक्रमे हिंदुत्ववादी राजकारण वाढलेले दिसते तसेच त्याची पाळेमुळे खोलवर रुजलेली दिसतात. एखादया धर्माला कल्पीत शञु मानून आपल्या धर्माच्या आधारे लोकांचे संघटन करणे किंवा त्याआधारे राजकीय प्रक्रियेत भाग घेणे हे एका अर्थाने समाजविघातक जमातवादी भावना वाढविण्यास कारणीभूत ठरत असते आशा जमातवादी भावनेतून सामाजिक जीवनात दंगली असुरक्षितता व द्वेष वाढतो. अशा जमातवादी राजकारणामुळे स्वातंत्र्य, समता, बंधूत्व या राजकीय मुल्यांना हरताळ फासला जातो राजकीय मुल्यरहित राजकारण हे फक्त अस्मीता व भावनेच्या खेळापूरते उरते त्यातुन विचार प्रक्रिया थंडावते. अशाप्रकारच्या जमातवादी राजकारणाने कित्येकाचे बळी घेतलेले आहेत कित्येकांना बेघर केलेले आहे. पन्नास वर्षानंतर या देशात फुटीरतेची बीजे पुन्हा पेरली जात आहेत याचे अपयश राजकारण्याकडे जाते एका पक्षाला (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) प्रदीर्घ सत्ता मिळूनही फुटीरवृत्तीवर उपाय करता आला नाही. कॉंग्रेसचे बोटचेपे धोरण फुटीरतेला खतपाणी घालणारे ठरले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वातंत्र्य चळवळीतील याचा सहभाग अगदी काठावरचा आहे कारण त्याचा म. गांधीजीच्या आहिंसेवर विश्वास नव्हता व शस्त्रसज्ज उठाव करण्याची ताकद त्याच्यात नव्हती त्यामुळे गांधीजीच्या विचाराची टिंगल टवाळी करणे तीस-चाळीस वर्षे भूमिगत राहून धार्मिक कट्टरतावादी आंधळा विचाराचा प्रचार त्यांनी केलेला. त्यांना पध्दतशीरपणे प्रसिद्धी माध्यमामध्ये माणसे पेरून-एखाद्या घटनेचा अर्थ कसा लावायचा, डाव कसा उलटवायचा, कांगावा कसा करावयाचा, आपल्या विचारसरणीचा प्रचार कसा करावयाचा याचे प्रशिक्षण त्यांना देवून हेतू साध्य केला आहे. मुलतत्ववादी विचारसरणीचे कार्य करण्याचे मार्ग

हेच असतात झापड लावून काम करणारी माणसे आहेत. बाबा वाक्यम् प्रमाणम् मानणारी माणसे हाताशी बाळगुन आपल्या विचाराचा प्रसार करण्याचे कार्य मुलतत्ववादी पार पाडतात.

धर्माचे नाव घेवून धर्म तत्वाच्या विचाराला तिलांजली दिली जात आहे. आग्रहपूर्वक ठासुन खोटे बोलण्याचा वसा घेतला गेला आहे. त्याची हत्यारे साधी सरळ निरुपद्रवी वाटतात आपण सहन केले म्हणून इतर जण मातले आता सहन करावयाचे नाही हे त्याचे घोष - वाक्य इतर संघटीत धर्म हिंदूचे शत्रु आहेत असे भासवणे व व्देषावर अधारित तत्वज्ञानाची मांडणी करणे हे त्यांच्या प्रचाराचे सुत्र आहे. अस्मितेचे कृत्रिम भूत निर्माण करणे गर्व से कहो हम हिंदू है हिंदू या देशात ८०% असून १५% मुस्लीम त्याच्या संघटीतपणामुळे हिंदुवर शिरजोरी करीत आहेत म्हणून सर्व हिंदुनी एकत्र या सहिष्णूतेचा ठेका का घ्यावा? हिंदूना संयमाचे धडे आता नकोत असे धडे इतरांना शिकवा धर्माचा अर्थ संप्रदाय असा करण्याचा प्रयत्न ते करतात. राजकीय स्वार्थासाठी (भाजपच्या सत्ताकांक्षेपाई) हिंदु समाजाला संप्रदायाच्या चौकटीत कोंबण्याचा दुर्विचार सध्या ह्या मंडळीकडून होत आहे. त्यातून विव्देषाचे जहरी विष पसरत आहे. असहिष्णूतेचे उदात्तीकरण हे पौरुषात्याचे लक्षण मानले गेले इतराच्या रूढी, चालीरितीना कमी लेखले जावू लागले. त्यातून बाबरी मज्जीद पाडली गेली (१९९२) हिंदु सनातन धर्माला काळीमा फासणारी ही गोष्ट आहे. त्यानंतर दोन्ही बाजूने वेडाचाराचे थैमान उभे केले गेले. त्यामुळे १९४७ च्या फाळणीइतकेच देशाचे नुकसान झाले. ४०० वर्षापूर्वीच्या कथीत अन्यायाला उकरुन काढणे ज्यामुळे लाखो लोकांची परवड केली गेली. काही मुठभरांच्या महत्वकांक्षेपायी पिढ्याण पिढया उंबरे लागून असणारी घरे रक्ताची तहान लागल्यासारखे एकमेकांची गळे घोटू लागली, (outlook survey mar. 1993.) इतके उन्मादी वातावरण निर्माण झाले. तेही धर्माच्या नावांवर राज्यकर्त्या एकच धर्म मानला पाहीजे तो म्हणजे परधर्मीयावर हल्ले, नन्सवर हल्ले, स्टेन्सच्या कोवळया मुलास्ह जाळून टाकणे, आक्रमकता, उध्दटपणा याचे कौतुक सुरु झाले. क्रमिक पुस्तकांत ढवळा-ढवळ सुरु झाली, कलेच्या क्षेत्रात धार्मिक भावना वाढीस लावण्याचे कार्य केले. थोडक्यात राज्यकर्त्यानी आगीत तेल ओतुन समाजात तेढ वाढवीली, चार्तुवण्य मनापासुन योग्य वाटतो पण बोलणे गैरसोयीचे वाटते, स्त्रियांनी पुरुषी अहंकार न दुखवता स्त्रियांनी मोठे व्हावे, भुतकाळातील भुत नाचवून अस्मितेचा विषारी डंख मारावयाचा, सिनेमा प्रदर्शनावर हल्ले, क्रिकेट पिच उखडणे, फायर पुस्तकांबाबत असहिष्णूता दाखवणे ही धर्मतत्वे नाहीत. तर धर्माधंता आहे. धर्मतत्व व धर्माधंता यात फरक आहे. खरा धार्मिक धर्मांध असु शकत नाही. इंटरनेटचा वापर विषारी विचार पसरविण्यासाठी केला जात आहे. धर्माचा प्रचार विचारासाठी नाही तर संख्यासाठी होतोय त्यात माणुसकीचा बळी जात आहे.

गोध्रा आणि गुजरात मधील हत्याकांडाने समस्त भारतीयाची झोप उडाली आहे. धर्माच्या नावाने हजारो माणसे क्रुर, अमानवी पध्दतीने मारली जातात याच दुःख आहे.

१९२६ साली डॉ.राधाकृष्णन यांनी हिंदु धर्माचे वर्णन केले होते Hindisum is more a way of life than a form of thought that gives absoulte liberty in the world of thought: हिंदु धर्म हा सहिष्णु, सर्वसमावेशक कनवाळू आहे. त्यात मोकळेपणा आहे. भारताची भुमि दुस-याच्या धर्माविषयी द्वेष न बाळगणारी सर्व धर्माला सादर अलिंगन देण्यास तयार आहे. असे स्वामी विवेकानंदानी शिकागो परिषदेत प्रतिपादन केले होते. आजचे हिंदुत्ववादी म्हणून घेणारे लोक यास सहमत आहेत काय? साने गुरूजी - भारतीय सस्कृंती पान ३२ ते ३७. महात्मा गांधीजी एवढा हिंदु तत्वज्ञानाचा थोर समर्थक नाही. हिंदु धर्मातील नैतिक मुल्याचा त्यांनी उदघोष केला आहे. हिंदू धर्माविषयी पं. जवाहरलाल नेहरु म्हणतात. India is a cultural unity amidst diversity, a bundle of contradictions held together by strong but invisible threads;

हा देश गौतम बुध्दाचा, शांती करुणेचा, म. गांधीजीच्या अहिंसा व सर्वधर्मभावाचा, राम कृष्णा सारख्या दैवी पुरुषाचा, वेद उपनिषिदांच्या उदात्त भावनेचा आहे. हे चिरंतन तत्व इथे गंगेच्या पवित्र पाण्याप्रमाणे हजारो वर्षे इथल्या माणसाला पोसत राहीला आहे. जगातील सर्वात प्राचिनतम सभ्यता व संस्कृति येथे आहे. इथे आलेले संत्ताध, मदांन्ध जगज्जेते इथल्या मातीपुढे नम्र झाले. इथेच रुळले इथलेच होवुन गेले. अनेक लहान मोठे सांस्कृतिक प्रवाह आले व इथलेच झाले. गंगेसम इथल्या मुळच्या प्रवाहात संपूर्णपणे स्वतःला समर्पित केले. म्हणुनच जर्मन विचावंत इमर्सन म्हणतो की, सर्व मानवी वैचित्र्याचे एकत्रित दर्शन भारतात घडते आहे. सर्व जगातील विचार वैभवाचे अत्युच्च शिखर म्हणजे भारतीय संस्कृती होय.

या देशात इतक्या वर्षाच्या काल प्रवाहातून हा माझा, आमचा, असा वेगळा भेद करणे अशक्य आहे. विविध भाषा, संगीत, इतर विविध, जीवनातील विविधता इथे अस्तित्वात असूनही सर्वांना एकत्रित बांधणारे एक चिरंतन तत्व आहे तेच भारतीयत्व म्हणून ओळखले जाते. या खंडप्राय देशाने निराकारातील आकार म्हणजे भारतीयत्व पांच हजार वर्षाच्या संचितामधुन इथला माणुस घडविला. पाकिस्तानच्या निर्मीतीने या संचितातुन निर्माण झालेल्या व्यक्तीमत्वाला तडा गेला. त्याच्या जखमा आजही भळभळत आहेत. गेल्या २० वर्षाच्या आक्रमक हिंदुत्ववादाच्या राजकारणामुळे भारतीय समाजात असहिष्णुतेचा राक्षसी विचार पेरला जात आहे. हिंदुत्ववादी पक्ष हिंदुत्वाचा उपयोग मते मिळविण्यसासठी करीत आहे.

आजच्या देशाच्या अखंडतेला व धर्म निरपेक्षतेला हे आव्हान आहे. आज जे हिंदुत्व वादी राजकारण दिसते ते वाढण्याची विविध कारणे आहेत त्यामध्यें राजकीय संघटना व राजकीय पक्ष मध्यवर्ती भुमिका बजावीत आहेत. भारतातील हिंदुत्ववादी राजकारणाचे विश्लेषण करण्यासाठी भारतात या पक्षाच्या राजकारणाचा उदय वाढ व विकास कसा झाला याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

भारतातील हिंदुत्ववादी पक्षाचे विश्लेषण करण्यापूर्वी स्वातंत्र्यपूर्व काळातील त्याची पार्श्वभुमी पाहणे आवश्यक आहे. ब्रिटीश वसाहत काळामधील सुरुवातीस दंगल म्हणून १८९३ च्या हिंदु-मुस्लीम दंगलीकडे पाहीले पाहीजे. यापूर्वी हिंदु राजकर्ते व मुस्लीम राजकर्ते याच्यामध्ये युध्दे होत होती परंतु त्याचा राज्य विस्तार हा मुख्यतः उददेश होता, येथे सर्व सामान्य हिंदु समूह आणि सर्व सामान्य मुस्लीम समूह यांच्यामध्ये दंगली झालेल्या आढळत नाहीत. परंतु १८९३ ची हिंदु-मुस्लिम दंगल ही दोन्ही सर्वसामान्य समुहातील दंगल होती या दंगलीला ब्रिटीश वसाहत कालीन धोरण कारणीभुत होते त्याच प्रमाणे याकाळात सर्वसामान्यामध्ये परस्पर - हित संबंधाची टक्कर होण्यास सुरुवात झाली होती. याकाळामध्ये भारतात दोन गोष्टी घडत गेलेल्या दिसतात. पहीली म्हणजे ब्रिटीशाच्या आगमनाबरोबर उदारमतवादी विचारांची परंपरा देशात रुजण्यास सुरुवात झाली. या विचाराच्या प्रभावाने धर्म, प्रथा, परंपरा, रुढी याची चिकित्सा होवू लागली. या प्रबोधनामुळे धार्मीक व सामाजिक सुधारणेस चालणा मिळाली दुसरी गोष्ट म्हणजे या प्रबोधन-काळात स्वातंत्र्याची प्रेरणा लाभल्यामुळे ब्रिटीश पारतंत्र्या विरुद्ध प्रतिक्रीया निर्माण होवू लागली प्रबोधन हे सामाजिक व धार्मिक सुधारणेशी अधिक निगडीत होते परंतु जेव्हा स्वांतत्र्याची निकड निर्माण होवू लागली तशा धार्मिक व सामाजिक सुधारणा मागे पडू लागल्या. त्याच दरम्यान येथील हिंदुचे आत्मभान जागृत करण्याच्या नावाखाली ब्राम्होसमाज, आर्यसमाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन इ. संघटनांनी हिंदू पुनर्जीवनवादासाठी मोलाचे कार्य केले. याचा पूर्ण विस्ताराची माहिती पहिल्या प्रकरणात आलेली आहे. या काळात लोकमान्य टिळकांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी नेमस्तवादी सनदशीर राजकारणाऐवजी (न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, बॅनर्जी इ.) लोकाद्वारे होणारी चळवळ आवश्यक वाटू लागली. लो. टिळकासारख्या राष्ट्रवादी नेत्यासमोर सर्वात महत्वाचा प्रश्न होता तो ब्रिटीश पारतंत्र्याविरुद्धात स्वांतंत्र्य चळवळीसाठी लोकांना कशाच्या आधारे संघटीत करावयाचे यासाठी लो. टिळकासारखे राष्ट्रवादी नेते सांस्कृतिक राष्ट्रवादाचा आधार घेतात. लो. टिकांनी त्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजंयती या सारखे उत्सव साजरे करण्यास सुरुवात केली. एका अर्थाने त्यातून हिंदू संघटन होणे हे अभिप्रेत होते. लो. टिळकांनी लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक आसणारी लोकाद्वारे चळवळ सुरु केली. लो. टिळकांना हिंदुराष्ट्र अभिप्रेत नव्हते हे निःसंशय खरे असले तरी स्वातंत्र्य चळवळीसाठी त्यांनी वापरलेली प्रतिके, घेतलेले कार्यक्रम त्यामुळे त्याच्या राष्ट्रवादास हिंदुत्वाची एक छटा प्राप्त झाली.

याच काळात मुस्लीम लीगच्या (१९०६) राजकारणाला विरोध करण्यासाठी हिंदु महासभा निर्माण झाली. हिंदुमहासभेला तिच्या राजकीय-राष्ट्रीय सर्वोच्च अशा वैचारीक पातळीवर पोहोचविण्याचे कार्य स्वा.सावरकरांनी केले. तोपर्यंत हिंदुमहसभेचे कार्य धार्मिक सामाजिक क्षेत्रापुरते मर्यादीत होते. म्हणजे धर्मातंराची शुध्दी, हिंदु समाज जागृती नी संघटन यापुरते मर्यादीत होते. हिंदु महासभा कॉंग्रेसची एक प्रकारची सामाजिक व राजकीय आघाडी होती, हिंदु महासभेचे अधिवेशन सुध्दा कॉंग्रेस समवेत भरत असे.

लो. टिळकांच्या मृत्यूनंतर म्हणजेच १९२० नंतर स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व मा.गांधीजीकडे आले. म. गांधीजींनी अहिंसा व सत्याग्रहाच्या आधारे स्वांतंत्र्य चळवळीला पुढे नेण्यास सुरुवात केली. म. गांधीनी ब्रिटीश विरोधात असहकार चळवळ सुरु केली. या असहकार आंदोलनांसाठी मुसलमानाचे सहाय्य लाभावे म्हणुन खिलाफतीची आफत ओढवुन इस्लामी धर्मांधतेला उघडपणे खतपाणी पुरवले त्यातुन मलबारी मोपलांचे अत्याचार, मुल्तानी आक्रमण, आतंकी कृत्ये व कोहट शोकांतीकेसारखे प्रकरणे एका पाठोपाठ घडून गेली हया सर्व घडामोडी म्हणजे इस्लामी विस्तारवाद नि आक्रमकच हयांच्या जिवंत साक्षीच होत्या. हिंदु-मुसलमान-ख्रिस्ती,पारशी, यहुदी अशा सर्वाचे मिळून मिसळून एक हिंदी राष्ट्र निर्माण करण्याच्या कॉंग्रेसी प्रयत्न इस्लाम धर्मात घटीत मुसलमानी मानसिकतेला मान्य होण्यासारख्या नव्हता, त्यातच म. गांधीजीनी चौरीचौराच्या हिंसक घटनेमुळे १९२२ ला असहकाराची चळवळ वापस घेतली. ले. कर्नल श्री. उपेंद्रनाथ मुखर्जी यांनी मृत्यृशय्येवर हिंदु वंश (A dying Race) लेख लिहून हिंदु महासभेने राजकीय दृष्टीने आधिक प्रभाविपणे कार्य केले पाहीजे असे मत व्यक्त केले.

याच दरम्यान महाराष्ट्रात हिंदु धर्माच्या आधारे संघटन करणारी संघटना म्हणून १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. संघसंरसंस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी देशाच्या स्वातंत्र्ययासाठी निष्ठा, चारित्र्य धैर्य एकजुट, निस्वार्थ या गुणांनी युक्त असी पीढी निर्माण करण्यासाठी युवा पिढीवर संस्कार देणारी अभिनव असी दैंनदिन शाखेची कार्यपध्दती त्यांनी शोधून काढली. या पद्धतीतुन हिम्मतवान, विजीगीषू स्वस्वार्थ हितासाठी सिद्ध असलेला तरुण कार्यकर्ते निर्माण झाले. डॉ. हेडगेवाराच्या अभिनव कार्यपद्धतीने चारित्र्याच्या धवल हिमालयाला जन्म दिला. त्याने संघाचा एक ठसा आणि दबदबा निर्माण झाला हे सर्व तरुण उच्चशिक्षित होते प्रत्येक शहराच्या तीन टक्के आणि ग्रामीण भागात एक टक्का गणवेशधारी तरुण संघाचा स्वयंसेवक आसावा असे लक्ष्य त्याच्या समोर होते त्यासाठी त्यांनी आपली सारी शक्ती पणाला लावती. १९४० पर्यंत आसाम एक अपवाद वगळता संघ सर्व प्रांतात स्थापन झाला होता डॉक्टरांनी आपल्या

मृत्यूपूर्वी उद्गार काढले की (१९४०) आज मी आपल्यासमोर हिंदुराष्ट्राचे लघुरुप बघत आहे. या देशातील हिंदू समाज स्वबळावर स्वातंत्र्य प्राप्त करु शकतो. इतरांची खुशामत करावयाची गरज नाही ते म्हणतात. इंग्रजी राज्य हे आपल्या अध:पतनाला कारण नाही. आपल्या अध:पतनाच्या तो परिणाम आहे. आपणच त्याचे राज्य चालवतो, आपणच त्यांचे सैनिक बनतो. अपल्यालाच आपण कोण? याचा विसर पडलेलाआहे. प्रथम ही आत्म-विस्मृती घालविण्याची गरज आहे. आत्मभान महत्वाचे आहे. म्हणून ते आग्रहाने प्रतिपादन करतात की आपण सारे हिंदु आहोत, सारे एक आहोत, जातीभेद आहे पण आपण हिंदु आहोत म्हणुन आपल्याला जात आहे. म्हणुन हिंदु ही केवळ जमात नाही ते राष्ट्र आहे. केवळ लोक म्हणजे राष्ट्र नव्हे मातृभुमिविषयी ओतप्रोत प्रेम आपले पूवर्ज आणि आपला इतिहास याच्याबध्दल गौरवाची भावना आणि आपल्या संस्कृतीवर अविचल निष्ठा या त्रिपडी विणीने लोकांचे राष्ट्र होत असते. या गुणानी युक्त जो समाज आहे त्याचे नाव हिंदु आहे. म्हणुन हे हिंदु राष्ट्र आहे. म्हणून संघ हिंदुसाठी आसला तरी तो राष्ट्रिय आहे कारण हिंदु म्हणजे राष्ट्र म्हणूनच त्याची आपल्या संघाचे नाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असे ठेवले.

डॉ. हेडगेवारांच्या काळात RSS एवढा आक्रमक नसला तरी तो पुढील हिंदुत्ववादी राजकारणाची नांदी होती. हिंदुत्वाला खऱ्या अर्थाने तात्विक अधिष्ठान सन १९३७ नंतर प्राप्त होण्यास सुरुवात होते. हे कार्य दोन व्यक्ती करत होत्या एक म्हणजे हिंदु महासभेचे अध्यक्ष असलेले स्वा.सावरकर दुसरे RSS चे अध्यक्ष गोळवलकर गुरुजी हे दोघेही भारत हे हिंदु राष्ट्र आहे असे म्हणत. सावरकर हिंदुत्वाच्या व्याख्येमध्ये भारतातील बौध्द, जैन, शिख, धर्मांचा समावेश करतात. तसेच आर्य समाज, प्रार्थनासमाज, वैदीक, शैव, वैष्णव, दत्तसंप्रदायी इ. वेगवेगळया पंथाचे अनूयायी सर्व आदीवासी, सर्व नास्तीक, सर्व निधर्मी हिंदुमध्ये येतात. परंतु ज्यु, पार्सी, ख्रिश्चन व मुस्लीमांना मात्र वगळतात. इस्लाम व ख्रिश्चन दोन्ही धर्म जगावर प्रभुत्व मिळविण्याची आंकांक्षा धरुन आहेत. इस्लाम तर मुसलमान होण्याचे नाकरले तर मृत्युदंड देवू शकतो (जिहाद) अशा रितीने हे सर्व हिंदूच्या विरोधात आहेत. सावरकरांनी हिंदुत्वाची आक्रमक रितीने मांडणी केली. उघड उघड फॅसिझमचा पुरस्कार केला. हिंदुत्वाच्या बिजा बरोबर फॅसिझमचा हा विचार त्याच्याशी बांधला गेला. अशा विचारातून भारताची फाळणी झाली. मुस्लींमासाठी पाकीस्तान निर्माण झाले यांची परिणीती गांधीना फाळणीस जबाबदार धरुन त्यांची हत्या करण्यात आली.

गोळवळकर गुरुजी हिंदुत्व म्हणजे राष्ट्रीयत्व मानतात. या दोघांनी हिंदुत्वाचा आधार घेवुन मुस्लीम विरोध मोठया प्रमाणात रुजवला. हिंदुत्वाच्या विचार प्रसार करण्यासाठी संघटना वाढविण्याचा प्रयन्त केला होता. स्वा. सावरकर आणि गोळवलकरांनी पेरलेले हे हिंदुत्वाचे बिज होते त्यातून गांधी हत्या झाली व गांधीहत्येनंतर RSS व हिंदुमहासभा या हिंदुत्ववादी संघटनावर बंदी घातली ही बंदी एका वर्षानंतर उठविली. म.गांधीच्या हत्येमुळे हिंदुत्ववादी विचारास गतीरोध बसला. परंतु हिंदुत्वाच्या पार्श्वभूमीवर देशात राजकीय प्रक्रियेत मोठया प्रमाणावर वाढणारा जमातवाद समावलेला होता. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात घडवली गेलेली हिंदुत्वाची पार्श्वभूमी ही पुढील हिंदुत्ववादी राजकीय पक्षांना तात्विक कार्यक्रम व तात्विक अधिष्ठान देण्यास काणीभूत ठरली.

ब्रिटीशानी १५ ऑगस्ट १९४७ भारताला स्वातंत्र्य देण्याचे घोषित केले पण आपली एक महाभयंकर अट लादून इंग्रजानी भारताचे तुकडे करुन स्वातंत्र्य दिले. या फाळणीच्या कृतीने भयंकर रक्तपात झाला. एखादया महायुध्दातही जेवढी प्राणहानी झाली नसती तेवढी प्राणहानी हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झाली. लाखो लोक निर्वासित बनुन भारतात आले या निर्वासीतांची व्यवस्था लावण्याच्या कामाला संघाने जुंपून घेतले. त्यासाठी स्वयंसेवकांनी प्राणाची बाजीही लावली संघ प्रथमच लोकाच्या नजरेत भरला सर्वत्र संघाची प्रशंसा होउ लागली. त्यामुळे संताकांक्षी काँग्रेसवाले क्षुब्ध झाले. संघाला फॅसिस्ट हिंसक म्हणू लागले मुसलमानाचे कर्दनकाळ म्हणून त्याचे वर्णन होवु लागले. संघद्वेष्टया मंडळीना म.गांधीजीच्या हया हत्याने संधी मिळाली ( जाने. १९४८ गांधी हत्या झाली.) हत्या करणारी व्यक्ती हिंदुत्वनिष्ट आहे हेच कारण दाखवुन संघावर बंदी घातली गेली. हजारो लोकाला तुरुंगात डांबण्यात आले हल्ला करणारे पकडले गेले गुरुजीवरील ३०२ कलम दोन दिवसात काढून टाकण्यात आले संघावरील बंदी उठवण्यात आली. संघ पुन्हा सुरु झाला

संघाचे पहिले उध्दिष्ट स्वातंत्र्य संपादन करणे होते ते प्राप्त झाले. आता संघाची गरज काय असा प्रश्न निर्माण झाला संघावरील बंदी उठवल्यानंतर भारताचे संविधान चारच महिन्यात तयार झाले. संघातील अनेकांना वाटले संघाचे रुपांतर राजकीय पक्षात करावे व दोन वर्षानी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भाग घ्यावा. एवढयात केंद्रीय मंत्रीमंडळातुन डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी बाहेर पडले. त्यांनी RSS प्रमुख गुरुजींची भेट घेतली (१९५१) गुरुजींची चार युवा नेते पुरवले दीनदयाल उपाध्याय, अटल बिहारी वाजपेयी, दत्तोपंत ठेंगडी, व नानाजी देशमुख त्यातुन भारतीय जनसंघ पक्षाची स्थापना झाली. यांच्यापूर्वी विदयार्थी जगतात साम्यवादाला आवर घालण्यासाठी राष्ट्रवादाचे बिजारोपण करणसाठी अ.भा.वि. परिषदेची स्थापना झाली होती. हे सर्व कार्य संघाला पुरक आहेत ते पर्याय नाहीत. हिंदूस्थान समाचार ही वृत्तसंस्था निघाली. कामगारामध्ये काम करण्यासाठी दत्तोपंथ ठेंगडी यांनी कामगार युनियन स्थापना केली. (हिंदु मजदुर युनियन) गुरुजीनी स्वातंत्र्याचा पुढाकार घेवुन विश्व हिंदु परिषदेची स्थापना केली. पण ही सर्व कार्य संघाची पुरक कार्य आहेत ती संघालापर्याय नाहीत संघ हा सर्वाच्या केंद्र स्थानी आहे.

| RSS च्या शाखा वर्ष | शाखांची संख्या |
|---|---|
| १९२५ | ०५ |
| १९३९ | ६०० |
| १९४३ | ७६० |
| १९४७ | १,००० |
| १९६९ | ७,००० |
| १९७५ | ८,००० |
| १९७७ | ११,००० |
| १९७८ | १३,००० |
| १९८० | १४,००० |
| १९८१ | १७,००० |
| १९९८ | ४०,०० |

## BJP

डॉ. हेडगेवार यांचे शॉर्ट टर्म गोल होते पारतंत्र्य भारताला स्वतंत्र करणे व लॉंग टर्म गोल होते स्वतंत्र भारताला स्थिर करुन समर्थ समृध्द राष्ट्र बनविणे (RSS) गांधी हत्येंनंतर RSS वर बंदी घातली गेली. कॉंग्रेसने तिनदा संघावर बंदी घातली १९४८,१९७५,१९९२ या काळात समाजात आपण एकटे पडल्याची जाणीव संघ नेत्याना झाली. अखिल भारतीय स्तराचे संघटन निर्माण करण्यासाठी RSS चा संघ परिवार निर्माण झाला.

BJP संघ परिवारातील राजकीय संघटना आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर भारतामध्ये हिंदुत्ववादी विचारसरणी असणाऱ्या भा.ज.प. ची स्थापणा १९५१ ला भारतीय जनसंघ या नावानी झाली. त्यावेळी हिंदुमहासभेचे जुणे नेते व ज. नेहरुच्या संयुक्त सरकारमधील डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांना पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवडयात आले. २१ ऑक्टोबरला नेताजी सुभाष बोस यांनी Indian National Army ची स्थापना केली होती. याच शुभमुहूर्तावर भारतीय जनसंघाची स्थापना २१ ऑक्टोबर १९५१ रोजी करण्यात आली. प्रथम प्रांतात नंतर संपूर्ण भारतात या अभिनव शैलीने संघ परिवारातील राजकीय पक्षांचा प्रारंभ झाला. डॉ.मुखर्जी यांना संघटनात्मक मदत करण्यासाठी पं.दिनदयाल उपाध्याय या RSS नेत्याची महामंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या स्थापना दिनाच्या पूर्वीच पं. जवाहरलाल नेहरु यांनी जनसंघाला पूर्ण चिरडून टाकीन असी वल्गना केली होती. पं. जवाहरलाल नेहरुची चिरडण्याची मानसिकता मी चिरडून टाकीन असे उत्तर डॉ. मुखर्जी यांनी दिले होते. त्यानंतर २३ जानेवारी १९५३ साली डॉ.मुखर्जी चे शंकास्पद स्थितीत निधन झाले. जनसंघ पोरका झाला सतत दहा वर्षे हा पक्ष अडचणीत होता. १९६२ मध्ये भारत-चीन सीमा तंटयानंतर पक्षाला उभारी यावयास सुरुवात झाली. १९६७ साली गैर कॉंग्रेसवादाची हवा डॉ. राममनोहर लोहिया यांनी निर्माण केली होती. तयाचा फायदा जनसंघाला झाला व लोकसभेच्या ३५ जागा मिळाल्या. १९७३ ते १९८० हा काळ लोक नायक जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीच्या प्रभावाचा होता. या दोन्ही वेळी जनसंघ व समाजवादी यांची युती झाली. प्रारंभी प्रांतिय सत्ता तीन राज्यात जनसंघाचे (जदतादल मुख्यमंत्री) नंतर प्रांतात व केंद्रात सत्ता युतीला प्राप्त झाली. जनता पक्ष विजयी झाल्यावर १९७७ पक्षाचे नेते सरकारमध्ये सामिल झाले. (वाजपेयी परराष्ट्र मंत्री तर अडवाणी माहिती व नभोवाणी मंत्री) पण १९७९ साली RSS जनता पक्ष अशा दूहेरी सदस्यत्वाच्या प्रश्नावरुन चरणसींग व समाजवादी नेते जनता पक्षातून बाहेर पडल्यानंतर मोरारजी देसाई यांचे सरकार पडले. त्यानंतर संसदीय निवडणूकीत जनता पक्षाला फक्त ३१ जागा मिळाल्या (२४% मतदान) त्यानंतर उर्वरीत पक्षात पून्हा दुहेरी सदस्यत्वाचा वाद माजला. तेंव्हा आता जनता पक्षात राहाण्यापेक्षा स्वताचे वेगळे आस्तित्व ठेवण्या करिता BJP ची स्थापणा केली. एकात्म मानवतावादा पासून दुर जाऊन १९८० मध्ये जनता पक्षाने गांधीवादी समाजवाद स्विकारला. या शिर्षासनामुळे भाजप १९५२ च्या मागे गेला १९५२ साली जनसंघाचे तीन खासदार होते १९८४ ते दोन झाले. त्यामुळे पक्षाने गांधीवादाचा त्याग करुन भाजप नेत्यांनी देवरस बंधूंच्या मार्गदर्शनाखाली पु:नश्च काम करावयाचे ठरविले. दिनदयाल उपाध्याय याच्या एकात्म मानवतावादाचा व हिंदूत्वाचा स्विकार केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंत्राने आयोध्याला राममंदीराचा जिर्णोद्वार करुन सेक्युलर रामराज्य निर्माण करण्याचे ठरविले. आडवाणी सारख्या आक्रमक नेत्याने आक्रमक हिंदुत्वाचा स्विकार केला. त्याला शहाबानो प्रकरणात राजीव गांधी सरकारने १९८६ केलेला चुकांचा हस्तक्षेप व रामजन्मभुमी प्रकरणी मिळालेला लोकांचा पाठींबा त्याचा लाभ भाजपाला झाला. नंतर राजीव गांधी यांच्या विरोधात जे लोकमत निर्माण झाले याचा लाभ घेण्यासाठी जनतापक्ष, लोकदल, व इतर पक्ष विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या नेतृत्वाखाली जनता दल म्हणून एकत्र आले. १९८९ झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत बोफोर्स सारख्या प्रकरणात भृष्टाचाराच्या अफवेमुळे राजीव गांधीच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसचा मोठा पराभव झाला कॉंग्रेसला फक्त १९७ जागा मिळाल्या जनता दलाला १४५ मिळाल्या विश्वनाथ प्रताप सिंग यांनी एका बाजुला BJP व दुसऱ्या बाजूला बाजुस

मानवतावादी पक्षाबरोबर (२१ वर्षाच्या प्रयत्नातून वाजपेयी सरकार केंद्रात आले व द्विध्रुवी लोकशाही मजबूत केली) आघाडी केली. व सरकार स्थापन केले. अशा रितीने व्हि.पि.सिंग यांनी सरकार व भाजप व माकप यांच्या पाठींब्यावर उभे राहीले. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारसी मान्य केल्या. भाजपने याचवेळी आक्रमकरित्या रामजन्मभूमी आंदोलन सुरु केले. मंडल आयोगाच्या राजकारणास प्रत्युत्तर देण्यासाठी भाजपने सोमनाथ ते अयोध्या ही रथयात्रा काढली. सरकारने ती आडवली, मग भाजपने पाठींबा काढून घेतल्यामूळे सिंग यांचे सरकार कोसळले. नंतर भाजपने अत्यंत चलाखिने राजकारण करीत एकाच वेळी मागास जातीच्या राखीव जागांना पाठींबा देऊन त्यांना हिंदुत्ववादी राजकारणात संघटीत केले त्याचा अनुकुल परिणाम झाला १९९१ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला ११९ जागा मिळाल्या. देशातील दोन मोठया पक्षापैकी एक पक्ष म्हणुन भाजपचा उदय झाला. त्याचवेळी जनता दलात उभी फुट पडून त्याचा फायदा भाजपला झाला. भाजपने गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, आसाम, मध्यप्रदेश, व उत्तर प्रदेश या प्रांतात सरकार स्थापण केले. त्यानंतर अडवाणी यांनी भाजपची ताकद कायम राखत प्रादेशिक पक्षांना आपल्या आघाडित सामील करुन घेऊन १९९६ च्या निवडणुकीत १६१ जागा मिळविल्या १९९८ साली १८१ जागा मिळविल्या १९९९ साली तेलगु देसम व द्रमुक, आण्णा द्रमुक लोकजनशक्ती या छोटया - मोठया पक्षासी आघाडी करुन राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापण केली व ५४२ पैकी ३०० पेक्षा आधिक जागा मिळविल्या आघाडीचे राजकारण करण्यासाठी जो लवचिकपणा आवश्यक असतो तो लवचीकपणा भाजपने दाखवला. आता तो काँग्रेसला दाखवावा लागतो. गेल्या ५० वर्षात भाजपचा कसा विकास झाला. या काळातील संसद निवडणुकाची सांख्यीकी माहिती असी आहे.

| वर्ष | जिंकलेल्या जागा | मताची टक्केवारी |
|---|---|---|
| १९५२ | ०३ | ३.०७ |
| १९५७ | ०४ | ५.९७ |
| १९६२ | १४ | ६.४४ |
| १९६७ | ३५ | ९.३५ |
| १९७१ | २२ | ७.३६ |
| १९७७ | भारतीय लोकदलाच्या नावाखाली निवडणुक | |
| १९८० | जनता पक्ष म्हणुन निवडणुक लढविली. | |
| १९८४ | ०२ | ४.७४ |
| १९८९ | ८६ | ११.४९ |
| १९९१ | १२१ | २०.२९ |
| १९९६ | १६१ | २०.२९ |
| १९९९ | १८२ | २३.७५ |
| २००४ | १३८ | २२.१६ |
| २००९ | | |

डॉ. हेडगेवार, गुरूजी गोळवळकर, व बाळासाहेब देवरस या द्रष्टया त्रिमुर्तीमुळे स्वयंसेवक अटलबिहारी बाजपेयी भारताचे पंतप्रधान झाले व स्वयंसेवक भैरोसिंह शेखावत भारताचे उपराष्ट्रपती झाले. भाजपने इंडिया २०२० चे जनक भारत रत्न अब्दुल कलाम यांना हिंदुस्थानचे राष्ट्रपती केले. भाजप सरकारमुळे भारत अण्वस्त्रधारी राष्ट्र झाले असुन २०२० साली संपन्न राष्ट्र होण्याच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे.

बाळासाहेब देवरस यांनी सरसंघचालक पदाची सुत्रे १९९४ साली सोडताच संघपरिवारात गोंधळाची स्थिती निर्माण झाली ती अजुनही चालु आहे. या काळयाकुटट ढगाला ६ वर्षाच्या रुपेरी कडा होत्या. गुरुजी गोळवळकर, बाळासाहेब देवरस संस्कारीत अटलबिहारी बाजपेयी- लालकृष्ण अडवाणी या नेत्येद्वयानी भारताला समृध्द व सामर्थ्यशाली करणारे सरकार (NDA) राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे शासन यशस्वी केले. या सहा वर्षात भाजप नेत्याने कार्यकर्तृत्व व संघनेतृत्वाला न दिसल्यामुळे भाजप सरकार २००४ साली सत्ता पदच्यूत झाले. बाजपेयी सरकार संघपरिवारातील हिंदुत्व वादामुळे पडले असे रा.स्वं.संघाचे अधिकृत प्रवक्ते राम माधव यांनी म्हटले. दुसरीकडे ब्रिटनचे प्रधानमंत्री टोनी ब्लेअर म्हणतात की, प्रचंड कामे केल्यानंतर सुध्दा बाजपेयींचे हिंदु सरकार निवडणुकीत पराभूत होवू शकते याचा आम्हाला धक्का बसला. १९९८ पासुन भाजप व अटल - अडवाणी यांचा संघ परिवाराने फुटबॉल केला. संरसंघचालक सुदर्शनजी, दत्तोपंत ठेंगडी व अशोकजी सिंघल या त्रिमुर्ती कडून विरोध भरपूर झाला. बाजपेयी यांना तरुणांकडे संत्तांतर करावे असा विचार प्रकट झाला २००३ साली साप्ताहिक आऊट लुकला दिलेल्या मुलाखतीतून सरसंघचालक सि.सुदर्शनजीनी आयोध्या मंदीर उभारण्याच्या संदर्भात आणी हिंदुत्वाच्या प्रश्नावर भाजपचे मातृसंघटनेसी मतभेद होते असे सांगीतले. आमचे राज्य येवूनही

जर आमचा कार्यक्रम पत्रिका राबवण्यात येत नसेल तर आमचे राज्य आहे असे म्हणण्यात काय अर्थ आहे. असी संघपरिवाराची भुमीका होती. भाजपने आपले ऐकावे आपणास मान व प्रतिष्ठा द्यावी स्वदेशी सारखी धोरणे पुढे रेटावी असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे भाजप व संघ यांच्यातील तणाव वाढला त्याचीच परिणीती २००४ च्या सत्ता पदच्युतीत झाली.

सहा वर्षे केंद्रात संत्तेवर राहील्याने भाजप वर विपरीत परिणाम झाले भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे बाहेर आली अनेक मंत्र्यांना भ्रष्टाचारामुळे पद सोडावी लागली. भाजपची चाल, चलन, व चरित्र आणि चेहरा काँग्रेस पेक्षा वेगळा नाही या गोष्टी करावयाला काँग्रेसवाल्यांना ५० वर्षे लागली त्या भाजपने पाच वर्षात केल्या. भाजपचे नैतिक अध:पतन झाले. त्यामुळे आमचा पक्ष वेगळा आहे असे म्हणणाऱ्या भाजपची काळी बाजु लोकांसमोर आली.

२००४ च्या निवडणुकीत काँग्रेसला १४५ जागा मिळाल्या व २६.५३ टक्के मते मिळाली काँग्रेसला स्पष्ट बहुमत नसल्याने त्यांना युती करणे भाग पडले. पंतप्रधान पदाचा त्याग करुन सोनियाजीनी जो मोठेपणा दाखविला व डॉ.मनमोहन सिंग यांना प्रधानमंत्री केले. डाव्या गटाच्या मेहरबानीवर काँग्रेसला २००९ पर्यंन्त चालवावे लागले. सोनियाजींनी इंदिरा गांधीच्या पावलावर पाऊल ठेऊन जनसंपर्क साधून स्वत:च्या हिंमतीवर आणि मेहनतीवर २००९ मध्ये सत्ता हस्तगत केली. २००९ ची जागा टक्केवारी ना जात पर ना पात पर सोनियाजिंनी बात पर मोहर लगाओ हात पर, या लोकप्रीय नाऱ्याप्रमाणे सर्व जनतेला त्यांनी आपलेसे केले व डावपेचांचे यशस्वी राजकारण करुन काँग्रेसला सत्तेवर आणले.

**चक्रव्युहात भाजप :-**

भाजप हा भारतातील सर्वात मोठा महत्वकांक्षी व हिंदुत्ववादी पक्ष आहे. त्याचप्रमाणे भारतीय राजकारणातील काँग्रेस विरोधी मुख्य पक्ष आहे. भाजप पुढें भविष्यातील राजकारणाचा विचार करता काही आव्हाने आहेत ही आव्हाने जर व्यवस्थितरित्या भाजप पेलु शकला तर पुढील पाच - दहा वर्षात निश्चितपणे भारतीय राजकारणात भविष्य आहे. संघ परिवाराच्या चक्रव्युहात अडकल्यामुळे भाजपचा २००४ आणि २००९ निवडणुकीत पराभव झाला हा चक्रव्युह संघनिर्मित आहे ? भाजप निर्मीत आहे? हा चक्रव्युह आदर्शवादाचा की मतवादाचा/ मतप्रणालीचा आहे हे समजुन घेतले पाहिजे.

रा.स्वं.संघ हा भाजपचा मुख्या आधार आहे. तो अजुनही भाजपला मार्गदर्शनाचे काम करतो. भा.ज.प. व आर.एस.एस. यांच्यातील संबध भा.ज.प. सत्तेवर आल्यापासुन तणावाचे होते कारण संघातही नेतृत्व परिवर्तन झाले होते. भाजपला सत्तेवर आणणारे त्यासाठी कुशल रणणिती आखणारे बाळासाहेब देवरस आणि राजेंद्रसिंग पडदयाआड गेले. त्यांच्या जागी के.सुदर्शनजी नवे सरसंघचालक के.सुदर्शन झाले. त्यांनी भाजपवर वर्चस्व गाजविण्यासाठी प्रत्यक्ष हस्तक्षेप सुरु केला. भाजपने आपले घर स्वत: सांभाळावे असे म्हणुन ते राजकीय धोरण ठरविण्यात, महत्वाच्या पदावर आपली माणसे बसविण्यात हस्तक्षेप करु लागले. धोरण्याच्या संदर्भात आपले मत उघड उघड व्यक्त करु लागले. आयोध्या मंदीर उभारण्याच्या संदर्भात आणि हिंदुत्वाच्या प्रश्नावर त्यांची आग्रही भुमीका होती. आमचे सरकार येऊनही जर आमची काग्रक्रम पत्रिका राबविण्यत येत नसेल तर आमचे सरकार आहे असे म्हणण्यात काय अर्थ आहे आशी त्यांची भुमीका होती. बाजपेयी यांना बदलण्याचाही त्यांनी प्रयत्न केला पण बाजपेयीच्या लोकप्रियते मुळे तो यशस्वी झाला नाही. परंतु भाजपने आपले ऐकावे, आपणास मान व प्रविष्ठा द्यावी स्वदेशी सारखी धोरणे पुढे रेटावी असा त्यांचा आग्रह होता. भाजप हा संसदीय राजकारणात तरबेज आसणारा व्यावहारीक पक्ष आहे. तर रा.स्व.स. आधुनिकतेच्या काळात आपला प्रभाव गमावत जाणारी. मध्ययुगीन विचार धारा आसणारी संघटना आहे. त्यामूळे भाजप आणि रा.स्व.संघ यांच्यातील तणाव वाढत आहे. मध्यंतराच्या काळात प्रविण तोगडिया व किशोर दास मिना, विश्वहिंदु परिषदेचे नेते अशोक सिंघल व यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढविला व आक्रमक हिंदुत्ववादाची असहिष्णूता आणि कट्टरपणा याचा उद्रेक केला.

२००४ मध्ये भाजपचा पराभव झाल्यानंतर हा संघर्ष आणखी वाढला. भाजपचा पराभव भाजपने हिंदुत्ववाच्या विचारसणीचा त्याग केल्यामुळे झाला असा टिका संघानी सुरु केली. त्यातच लालकृष्ण आडवाणी यांनी पाकीस्तान मध्ये जाऊन कायदे आझम जिन्हा हे धर्म निरपेक्षवादी होते असी स्तुती सुमने उधळली. (जुन २००५) त्याचा परिणाम भारतात संघ परिवारातच तिव्र प्रतिक्रिया उमटल्या भाजपमध्ये नेतृत्वाचा व सत्ता संघर्षाचा प्रश्न तीव्र बनला. भाजपने तरुणाकडे नेतृत्व सोपवावे असा सल्ला दिला. थोडक्यात संघपरिवाराला एकसंघता राहिलेली नाही. त्याचा अंतर्विरोध वाढला गेला. भाजपला राजकारणासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडीमुळे त्यांच्यात भ्रष्टाचाराची व ऐषआरामाची संस्कृती शिरली संघसृष्टीतल्या या अंतर्विरोधामुळे २००९च्या संसदीय निवडणुकीत भाजपला आपला करिष्मा दाखवता आला नाही व हार पत्करावी लागली.

चारित्र्य, कळकळ, प्रमाणिकपणा, परिवर्तनाची निष्ठा, उच्च शिक्षण, सर्वोदय सेवा कार्य, ग्रामविकास वणवासी कल्याण, ईत्यादी वैशिष्टयाच्या आधारामुळे Democracy of Hindu that is Bhartiya that is Indian Proleteriate हे स्वप्न साकारू शकले. संघ हा बहूध्रुवी आहे प्रथम संघबंदी नंतर (१९४८) गुरुजी गोळवलकर व बाळासाहेब देवरस या उभयतांनी संघपरिवार निर्माण करण्याची योजना आखली व सृजनशिलतेची ती आमलात आणली. त्यातुन संघाचा हॉरिझॉन्टल विकास झाला RSS (राष्ट्रीय स्वयं संघ व राष्ट्र सेविका समिती) नेटवर्कमध्ये खालील मास-ऑर्गनायजेशनचा समावेश होतो.

१) आखील भारतीय विद्यार्थी परिषद - १३/०६/१९४८
२) भारतीय जनसंघ - २१/१०/१९५१
३) भारतीय जनता पक्ष - १९८०
४) आखील भरतीय वनवासी कल्याण आश्रम १९७७
५) विद्या भारती-१९७७
६) भारतीय मदजुर संघ - २३/०७/१९५५
७) विश्व हिंदु परिषद -२९/०८/१९६४
८) भारतीय किसान संघ - ०३/०३/१९७९
९) स्वदेशी जागरण मंच-
१०) सामाजिक समरसता मंच-
११) सर्वपंथ समादर मंच-

संघ परिवाराच्या गोतवाळयातील अंर्तर्विरोध कमी झाला व संघ एकसंघ झाला तर भा.ज.प.चे भारतीय राजकारणात पुन्हा पुनरागमन नक्कीच होईल, के. पी. जस्वाल, The Hindu Polity Saffron wave.

भाजपचे दुसरे आव्हान आहे. भाजपची इच्छा असो वा नसो सतत १०-१५ वर्षे भारताचे राजकारण आघाडीचे राजकारण राहाणार आहे. भाजपला जर आघाडीचे राजकारण करावयाचे असेल तर अतिरेकी हिंदुत्वाचे, सांस्कृतिक अस्मितेचे आणि मुस्लीम द्वेषाचे राजकारण करुन चालणार नाही गुजरातची किंमत पक्षाला २००४ व २००९ साली दयावी लागली.

भाजप पुढे तिसरे आव्हान आहे त्यांच्या वैचारिक भुमिकेबाबत आहे. भाजप उजव्या राजकारणाचा पुरस्कार करणारा पक्ष होणार का? आहे- कारण काँग्रेसने डावीकडे झुकणारी मध्यमवादाची भुमिका स्विकारली व डावे पक्ष काँग्रेसच्या विचारसरणीला काही प्रमाणात पाठींबा देत आहेत. २००४ ते २००९ पर्यंत काँग्रेस सरकार डाव्या पक्षाच्या पाठींब्यावर सत्तेवर होते. याउलट भाजप सत्तेवर असताना नव्या आर्थिक धोरणाचा निकराने पुरस्कार केला हे धोरण दलालांना व भांडवलदारांना प्रिय आहे. या धोरणामुळे समाजात विषमता वाढली. एकीकडे India shining तर दुसरीकडे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यामुळे इंडीया आणि भारत दोन्हीतील संघर्ष वाढला त्यामुळे भाजपचे मित्रपक्ष भाजपला सोडून जात आहेत.

आता मुख्य प्रश्न आहे तो भाजपच्या पुनरागमनाच्या शक्यते बाबत २००४ व २००९ भाजपचा पराभव झाला असला तरी तो पक्ष सत्तेपासुन दुर गेलेला असला तरी त्या पक्षाची ताकद किती राज्यात आहे? भा. ज. प. ९ राज्यात मध्यम भारतात व पश्चीम भारतात कमी झालेली नाही. उलट २००८ मध्ये कर्नाटक विधानसभेत पक्षाला पूर्ण बहूमत प्राप्त केले. दक्षिण भारतात भा.ज.प.चे पहिले सरकार स्थापन झाले. आंध्रात पक्ष कमजोर आहे व तामिळनाडू आणि केरळात त्यास फारसे स्थान नाही.

लोकसभेत भाजपला जास्तीत जास्त १५० जागा मिळू शकतात त्यापेक्षा जास्त जागा भाजपला मिळत नाहीत. मिळणारही नाही याची जाणीव पक्ष नेतृत्वाला आहे. म्हणुन काँग्रेस विरोधी आघाडीचा सुकानू धारक पक्ष म्हणून आपणास काम करावयाचे आहे याची जाणीव त्यांना आहे. त्यासाठी बाजपेयी सारख्या मध्यममार्गी नेतृत्वाची पक्षाला गरज आहे. जर केंद्रातील सत्तेचे राजकारण करावयचे आसेल तर अजुन काही वर्षे तरी भाजपला आघाडी राजकारणाशिवाय पर्याय नाही. त्यासाठी प्रादेशिक पक्षाचा आधार घ्यावाच लागेल.

भाजपने हिंदुत्वाचा पुरस्कार केला हा पुरस्कार त्यांनी पक्षाच्या जाहीरनाम्यात केला पण प्रत्यक्ष राजकारणात त्याची अमलबजावणी करण्यात आली नाही. हे लक्षात घेवून भाजपणे आपल्या हिंदुत्ववादी तत्वज्ञानाचा ध्येय-धोरणाचा पुनर्विचार करुन वाटचाल करावी लागेल. कारण हिंदुत्ववादी तत्वज्ञान व त्याचे प्रत्येक राजकारणातील स्वरुप यात विसंवाद आहे.

**शिवसेना**

हिंदुत्ववादी राजकारणाला आक्रमक स्वरुप देणाऱ्या शिवसेनेचा जन्म १९६६ मध्ये झाला. शिवसेनेचे बीज मार्मिक मध्ये दिसुन येते. मुंबईत ऑगस्ट १९६० च्या सुमारास मार्मीकचा शुभारंभ झाला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार होते. त्यावेळी मुंबई शहरात दोन प्रमुख समस्या होत्या. एक म्हणजे मराठी माणसाला नोकऱ्या मिळत नव्हत्या. नोकऱ्यामध्ये त्यांच्यावर अन्याय होत होते. आणि त्याचबरोबर मुंबईत कम्युनिस्टांचा प्रभाव वाढला होता.

मार्मिकमधुन मराठी माणसाचे स्थितीचे वर्णन सुरु झाले १९५१ मध्ये मराठी माणसाची लोकसंख्या ४३.३ होती १९६१ ही लोकसंख्या ४२.०८ एवढी झाली. पुढे होणाऱ्या प्रत्येक जनगणनेत ही घट सुरुच राहीली. मुंबईचा उपयोग दाक्षिणात्य आणि उत्तरेकडील गुंडानी अवैध धंदे चालविण्यासाठी केला. वरदभाई, हाजी मस्तान, करीमलाला, युसूफ पटेल, ई. त्यामुळे मराठी तरुणाची कोंडी झाली. या सर्व परिस्थितीत मराठी माणासांच्या न्याय हक्कासाठी प्राणपणांनी झुंजणारी संघटना असावी याच भावनेतुन शिवसेनेचा जन्म झाला. ५ जुन १९६६ च्या मार्मिकच्या अंकात युडू गुंडु च्या मराठी

माणसाच्या हक्कावारील आक्रमण परतावून लावण्यासाठी शिवसेनेची नोंदणी सुरु झाली. त्यासाठी शिवसेनेच्या सदस्यत्वाचे फॉर्म छापून विक्रीसाठी ठेवले गेले. पहिल्या दोन दिवसात २० हजार अर्जाची विक्री झाली. व शिवसेनेच्या स्थापनेसाठी १९ जुन १९६६ ही तारीख बाळासाहेबांनी निश्चित केली. ही सभा शिवाजी पर्कवर पार पाडली. म. गांधी, नेहरु, आचार्य अत्रे यांच्या सभेपेक्षाही जास्त गर्दी या सभेला होती. यासाभेत प्रबोधनकार ठाकरे (केशव सिताराम ठाकरे बाळासाहेबांचे वडील) म्हणाले की, आजवर ठाकरे कुटुंबाचा असलेला हा बाळ मी महाराष्ट्राला देऊन टाकत आहे. या सभेनंतर आजपर्यंत मराठी माणुस शिवसेना प्रमुखाच्या पाठीशी उभा राहीला आहे. १० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतिर्थावर बाळेसाहेबांच्या पाठींब्याने प्रचंड मेळावा घेतला. या मेळयाव्यातून परत जाताना दाक्षिण्यात्यांची काही हॉटेल्स तोडण्यात आली. दगडफेक झाली. **हटाव लुंगी बजाव पुंगीचा** नारा देण्यात आला.

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर महाराष्ट्राचे राजकारण मुख्यतः कॉंग्रेसप्रणीत आणि कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील विस्तारत गेले. दिर्घ काळापर्यंत महाराष्ट्रात विरोधी पक्षीयांना सत्ताप्राप्तीमध्ये यश मिळू शकले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील जी राजकीय पीढीस्वातंत्र्योत्तर काळात राजकारण करीत होती तिच्या राजकाणाचा आवाज सर्वसमावेशक स्वरुपाचा होता. आजही सर्वांचे प्रतिनिधीत्व करु शकणारा स्थानिक प्रश्नांवर कॉंग्रेस नेतृत्वाने आधिक लक्ष केंद्रीत करण्या ऐवजी व्यापक पायावर औद्योगीकरण आणि त्याअनुषंगाने व्यापक असा आर्थिक विकासाचा विचार स्विकारलेला आहे कॉंग्रेसच्या राजकारणात स्थानिक प्रश्नांबाबत असणारी उदासिनता ही वेगळया स्वरुपात वेगळया राजकीय संदर्भात व्यक्त झाल्याचे दिसुन येते. मुंबई शहरामध्ये दाक्षिणात्याचे व गुजरातचे असलेले अर्थकारण स्थानीक मराठी माणसाला अडचणीचे ठरले. कोणत्याही पक्षसंघटनांची राजकारणाची प्रक्रिया ही जसी स्थानीक प्रश्नांसी संबधीत असते तसेच ती धोरणात्मक स्वरुपात आंतरराष्ट्रीय पातळीवर पण घडत असते. महाराष्ट्रात मराठी माणसाचा प्रश्न बाळासाहेब ठाकरेंनी समजून घेतला आणि माहाराष्ट्र राजकारणातील पोकळी शिवसेनेच्या राजकारणांनी भरुन काढली. प्रारंभीची शिवसेना मराठी माणसाचे राजकारण करण्यापर्यंत मर्यादीत होती नंतर तिचा आवाका वाढत जाऊन हिंदुत्ववादी राजकारणाला कृतिप्रदाणतता आणण्यामध्ये शिवसेना सक्रीय झाली या अनुषंगाने शिवसेना जन्माचा आढावा घेणे संयुक्तिक ठरेल.

थोडक्यात शिवसेना ही संघटना संयुक्त महाराष्ट्रातून निर्माण झालेली मराठी भाषिकांची अस्मिता जपण्यासाठी पुढे आली मराठी भाषेतुन फलक लावणे, मराठी भाषिकांच्या प्रश्नाविषयी झगडणे यातून शिवसेना मुंबईत पसरली. बाळासाहेब म्हणतात शिवसेना ८०% समाजकारण व २०% राजकारण करते. वृक्षारोपन, रक्तदान, नेत्रदान, रुग्णवाहीका यासांरखे कार्यक्रम शिवसैनिकांना देण्यात आले. ऐंसी टक्के नोकऱ्या मराठी माणसाला व सामाजिका कार्याला प्राधान्य या कार्यातुनच शिवसेना मुंबईच्या महानगरपालिका निवडणुकीत भाग घेऊ लागली. शिवसेनेने मराठी भाषिकासाठी झगडण्या बरोबर कम्युनिस्ट विरोधी आंदोलने केली. जर शिवसेना नसती तर आज मुंबई कम्युनिस्टांची झाली असती. कम्युनिझमला वेसन घालणारे कार्य शिवसेनेने केले.

शिवसेनेने १९७२ च्या निवडणुका लढवल्या परंतु २६ जागापैकी एका ठिकाणी विजय प्राप्त झाला. तर १९७८ च्या निवडणुकीत शिवसेनेला एकही जागा मिळाली नाही.

महाराष्ट्रातुन १९७८ मध्ये कॉंग्रेसमध्ये फुट पाडुन इंदिरानिस्ट व इंदिराविरोधक अशी विभागनी झाली त्यातुन कॉंग्रेस एस. नावाचा पक्ष उदयास आला. कॉंग्रेसच्या या विभगणीच्या पोकळीत शिवसेना व भाजप या हिंदुत्ववादी पक्षाच्या वाढीचे वातावरण निर्माण झाले. १९८४ मध्ये मुंबई व भिवंडी मध्ये दंगली झाल्या याचे शिवसेने सेनेने समर्थन केले. त्याचप्रमाणे मराठवाडा विद्यापिठाचा नामांतर चळवळी शिवसेने विरोध केला. याचवेळी मिनाक्षीपुरम येथील धर्मांतर या पार्श्वभुमीवर बाळासाहेब ठाकरे हे हिंदुऱ्हदय सम्राट बनले. याच दरम्यान १९८६ मध्ये शरद पवारांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे निर्माण झालेली पोकळी शिवसेनेला भरता आली शिवसेनेने मराठवाडयात व विदर्भात आपले स्थान निर्माण केले. मुंबईतील विलेपार्ले येथे झालेली डॉ. रमेश प्रभु या निवडणुकीत शिवसेनेने प्रथमच हिंदुत्वाचा मुद्दा जोरात घेतला जरी शिवसेना मराठी माणसाची कामे करीत होती तरी प्रथमपासुन हिंदुत्ववादी होती परंतु हिंदुत्व हा विषय घेऊन पार्ल्याची निवडणुक लढवली. गर्व से कहो हम हिंदु है ही बाळासाहेबांनी केलेली घोषणा मराठी माणसावरील अन्याय सहन करणार नाही असे म्हणणारी शिवसेना हिंदुत्वावर बोलू लागली. ज्याक्षणी शिवसेनेनी ही भुमीका घेतली त्याक्षणी शिवसेना मुंबई-पुणे-ठाण्याच्या बाहेर पडली. आणि महाराष्ट्रभर फोफावली. मराठी मनाचा केंद्रबिंदु जगप्रसिध्द व्यंगचित्रकार शिवसेना प्रमुख आज हिंदुऱ्हदय सम्राट झाले. शिवजयंतीला हिंदुत्ववादी आवरण प्राप्त झाले. गांवा-गावात शिवजंयंत्या साजऱ्या होऊ लागल्या जय शिवाजी, जय भवानी असे नारे सर्वत्र दुमदुमु लागले. महाराष्ट्रात शिवसेना व नंतर भाजपा एकाच वेळी हिंदुत्ववादी शक्ती म्हणुन पुढे येतात. त्यासाठी लालकृष्ण आडवाणी यांना बाबरी मशीदीच्या जागी राममंदीराची पुर्नस्थापणा करण्यासाठी सुरु केलेली रामरथ यात्रेचा परिणाम सर्व दुर होऊ लागला. त्यामुळे हिंदुत्ववादी संघटना प्रभावी होऊ लागल्या, विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, अशा संघटनाद्वारे हिंदुत्ववादी विचराच्या प्रचाराला व्यासपिठ मिळाले. त्यातुनच एकीकडे हिंदुत्व धार्मिक भावना चेतवण्याचा प्रयत्न केला गेला. तर दुसरीकडे मुस्लीम-विरोध निर्माण केला गेला. यातुन हिंदुचे हिंदुत्वकरण होण्यास चालना मिळाली पुढे महाराष्ट्रात हिंदुत्वाच्या मुद्यावर १९८९ ला शिवसेना व भाजप युती झाली १९८५ च्या निवडणुकीत भाजपला १६ तर शिवसेनेला ९ जागा मिळाल्या. या निवडणुकीत भाजपची मतदान टक्केवारी ही

शिवसेनेपेक्षा जास्त होती. महाराष्ट्रात हिंदुत्ववादी मुददा प्रभावी बनल्यानंतर व शिवसेना - भाजप युती झाल्यानंतर १९९० च्या निवडणुकीत भाजपला ४२ तर शिवसेनेला ५२ जागा मिळाल्या व दोघांची मताची टक्केवारी २५% जास्त वाढली या हिंदुत्ववादी राजकारणाबरोबरच १९८० नंतर नव हिदुंत्ववादी संघटना उदयास आल्या पतितपावन संघटना, हिंदु एकता आंदोलन, हिंदु सेना, बहुजन युवा, मराठा महासंघ, सामाजिक समरसता मंच, वनवासी कल्याण, आशा या संघटनानी हिंदुत्ववादी मुददे उठवले. हिंदूत्वाचा प्रचार करणे व हिंदुचे संघटन करण्याचा प्रयत्न क्रणे या हिंदुत्ववादी राजकारणामुळे उच्च जाती खेरीज इतर जातीना हिंदुत्वाचे आत्मभान येऊन त्यांना हिंदुत्वाकडे ओढता आले. या संघटनात्मक कार्याबरोबर बाळासाहेब ठाकरे यांनी आक्रमक भाषणबाजी, हिंदु आस्मिता आधारे विविध शहरांची वास्तुचे नामांतर करणे, शिवाजी महराजांना हिंदवी स्वराज्याचा निर्माता म्हणुन पुढे आणणे. ठिकठिकाणी शिवाजी महाराजाच्या पुतळयाचे अनावरण करणे. जय शिवाजी जय भवानी अशा सारख्या बोलण्यात चपखल बसणाऱ्या घोषणा या सर्वाच्या जोडीला राम जन्मभुमीचा मुददा या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणुन वाढता हिंदुत्ववाद सर्वसामान्याच्या मनामध्ये बिंबविला गेला. या वाढत्या हिंदुत्व करणामुळे १९९२ ला बाबरी मशिद पाडली गेली. त्यानंतर भारतभर हिंदु-मुस्लीम दंगली उसळया १९९३ ला मुंबईत भयानक दंगल झाली. महाराष्ट्रात एकुण ३२ ठिकाणी दंगली झाल्या त्यात ३४३ लोक बळी गेले. या काळात झालेल्या दंगलीमुळे हिंदुत्ववादी राजकारणास गती मिळाली. याचा परिणाम १९९५ च्या विधान सभा निवडणुकीवर झाला. या निवडणुकीत शिवसेना ७३ जागा मिळाल्या तर भाजपला ६५ जागा मिळाल्या. त्यामुळे महाराष्ट्रात पहिल्यांदाच हिंदुत्ववादी राजकीय पक्षाचे शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर आले. युतीला मराठा कुनबी समाजाची २६% मते मिळाली. तर ओ.बी.सी. ची ३०% टक्के मिळाली. सेनेला मराठा-कुनबी व ओबीसी समाजातून मोठया प्रमाणात पाठींबा मिळाला तर भाजपला उच्च जाती, मध्यम जाती, ओबीसी व अमराठी समाजातून मोठया प्रमाणात पाठींबा मिळाला. तसे बाबरी मशीद पाडाव प्रकरणी व मुंबई दंगली प्रसंगी कॉंग्रेस निष्क्रीय राहील्यामुळे मुस्लीम समाज कॉंग्रेस पासुन दुरावला त्यामुळे १९९५ मध्ये सत्तांतर झाले. कॉंग्रेसला विरोधी बाकावर बसावे लागले थोडक्यात १९९५ च्या संत्तातरास कॉंग्रेस मधील बंडखोरी आणि धर्मनिरपेक्ष मताची विभागणी ही घटक कारणीभुत ठरले. बिगर कॉंग्रेस सरकार अस्तीत्वात आले या दरम्यान झालेल्या १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात युतीने १९९५ मधील यश टिकविले तर कॉंग्रेसची १९९६ मध्ये हार झाली. प. महाराष्ट्राचा अपवाद वगळता सर्वच विभागात युतीने कॉंग्रेसचा पराभव केला. युतीने ४८पैकी ३३ जागा जिंकल्या (BJP१८, सेना १५) तर कॉंग्रेसला १५ जागेवर समाधान मानावे लागले. केंद्रातील आस्थिरतेमुळे १९९८ मध्ये देशात पुन्हा लोकसभा निवडणुका झाल्या त्यात युतीचा पराभव झाला. कॉंग्रेसला ३३ तर रिपब्लीकन पार्टीला ४ जागा मिळाल्या तर युतीला १० जागा (BJP४ सेना ६) मिळाल्या कॉंग्रेसच्या दीर्घ राजवटीस कंटाळलेल्या लोकांना नवीन सरकारकडून मोठया आपेक्षा होत्या. पण युतीच्या साडेचार वर्षाची धोरणे पाहिली तर त्या घोषणापलिकडे काही नव्हते. झुनका-भाकर योजना झ ोपडपट्टी वासीयांना मोफत घरे ई.योजनाचा बोजवारा उडाला. प्रत्येक योजना खाजगीकरणद्वारे करणे एन्रॉन प्रकल्पाच्या पुनर्जीवनाने युतीची विश्वासाहर्ता अरबी समुद्रात बुडाली. श्रीकृष्ण आयोग फेटाळून व अल्पसंख्याक आयोग रदद करणे यातुन अल्पसंख्याक विषयक धोरण प्रकट झाले. या सर्वाचा परिणाम १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप-सेना युतीचा पराभव झाला. महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी राजकारणाला पुढे उतरती कळा लागली. कोणत्याही भावनेचा आवेश मर्यादीत काळापुरता राहत असतो. ती व्यक्ती व समाजालाही लागु असतो. काही काळानंतर भावना थंडावते. विचार प्रक्रिया सुरु होते. हिंदुत्वाच्या आधारे संघटन, इतर धर्मीय विरोध, जमातवादी दंगली व राजकारण हे रेषा स्पष्ट दिसु लागली. याचा रोष कमी करण्यासाठी २००४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने विकास या भावनेचा बुरखा घातला व फील गुड आणि इंडीया शायनिंग म्हणुन घोषणा केल्या गेल्या २००४ मध्ये भाजपला आपला विजय निश्चीत आहे असे वाटत असतानाच जनतेने या हिंदुत्वाद्याचा पराभव केला. महाराष्ट्रातही विधानसभा निवडणुकीत भाजप-सेना युतीचा पराभव झाला. २००४ नंतर महाराष्ट्रात शिवसेना व राष्ट्रीय स्तरावर भाजप थंडावलेली दिसते.

### शिवसेनेचा विकास कसा झाला:-

१९७२ ते २००४ या काळांतील महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची सांख्यकी माहिती अशी आहे.

| वर्ष | लढवलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | मतदान % |
|---|---|---|---|
| १९७२ | २६ | ०१ | १.८० |
| १९७८ | ३५ | ०० | १.८२ |
| १९८० | निवडणुका लढविल्या नाहीत | | |
| १९८५ | ३३ | ०१ | २.०० |
| १९९० | १८३ | ५२ | १६.३० |
| १९९५ | १६९ | ७३ | १६.३९ |
| १९९९ | १६१ | ६९ | १७.३३ |
| २००४ | १६३ | ६२ | १९.७९ |

या ठिकाणी आपण महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी राजकारणाचा आढावा घेतलेला आहे. हिंदूत्ववादी राजकारण स्वातंत्र्यपूर्व काळात सुरु झाले ते १९८० पुर्वीपर्यंत शांत होते. परंतु १९८० ते २००४ पर्यंत ते तिव्र झालेले दिसते २००४ नंतर महाराष्ट्रातील राजकीय चौकट बदलण्यास सुरुवात झाली हिंदुत्ववाद्या विरुध्द धर्मनिरपेक्ष पक्षाच्या युतीचा अनुभव यशस्वीझ ाला. शिवसेनेतुन नारायण राणेनी बाहेर पडुन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. दुसरीकडे राज ठाकरे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करुन महाराष्ट्र नवनिर्माण सेना या नवीन पक्षाची स्थापणा केली. आता शिवसेनेत देखील हिंदुत्वाचा मुद्या उचलण्याची शक्ती राहीलेली नाही. आणि राष्ट्रीय स्तरावर भाजप व त्याच्या आघाडीला (NDA) २००९ च्या लोकसभा निवडणुकीत दारुन पराभव स्विकारावा लागला. म्हणुन आजही भाजप हिंदुत्व मुद्या बाबत द्विधा आवस्थेत दिसतो. महाराष्ट्रात होणाऱ्या २००९ च्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघाचीा पुर्नरचना झालेली आहे. त्यामुळे ग्रामीण व शहरी राजकारणाची समिकरणे बदलेली आहे. महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत आहेत आदीवासी भुकबळी पडत आहे. काँग्रेस नाकर्त्या सरकारवर महाराष्ट्राची जनता नाराज आहे. आज विकासाच्या राजकारण्यांची गरज आहे. या काळात हिंदुत्वाचे राजकाण शांत असेल जेव्हा पुरोगामी व धर्मनिरपेक्षवादी पक्ष किंवा विचार यामध्ये फुट पडते व जेव्हा सर्व सामान्यांच्या हिंतामध्ये टक्कर होवु लागते. त्याची शांततापूर्वक सोडवणुक होत नाही तेव्हा या पोकळीतुन धर्मवादी राजकारण उभे राहते.

२००४ आणि २००९ च्या निवडणुकांत हिंदुत्वाचा रथ रोखला गेला आहे. भाजप व संघ परिवाराचे संबंध गुंतागुंतीचे आहेत दर वेळेस संघ सांगतो तसे भाजप ऐकतो असे नाही संघ परिवाराला हिंदुराष्ट्रवाद प्रिय आहे जर भाजपला सत्तेचे राजकारण करावयाचे आहे. भारतासारख्या व्यामिश्र देशात भाजप व शिवसेना पक्षाला एका मर्यादानंतर यश मिळणे अवघड आहे. या टप्पयाच्या पुढे जावयाचे असेल तर भाजपला सर्वसमावेश भुमीका घ्यावी लागेल. व त्याप्रमाणात हिंदुत्वाचा कार्यक्रम पातळ करावा लागेल. याचाच अर्थ भाजपला काँग्रेसप्रमाणे व्हावे लागेल. प्रा.मेघनाथ देसाई, प्र. २५५ Hindu Natianalism.

IPL च्या सामन्यात ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटुंना खेळू न देण्याचा निर्णय घेंणे. कांही देशांत राजकारण झपाटयाने बदलत आहे. जात, धर्म आदि आस्मीतावादी राजकारणाच्या मागण्या दुर होऊन विकास हा मुददा राजकीय पटलावर येत आहे. असे होत असताना महाराष्ट्रातील राजकारण मात्र विकासवादी राजकारणापासुन आलीप्त होत आहे. उलट महाराष्ट्र दिवसें दिवस झुंडशाही च्या आस्मितावादी राजकारणाच्या गर्तेत ढकलला जात आहे. बाळासाहेब म्हणतात ऑस्ट्रेलीयन खेळाडुंना भारतात खेळायला विरोध करणे देशप्रेमाचे द्योतक आहे. ही एक राष्ट्रवादी भुमीका आहे. पण या भुमिकेत विसंगती आहे. कारण शिवसेनेचा जन्म हा भाषीक, प्रांतिक अस्मीतेतुन झाला आहे. मुंबईत होत असलेले परप्रांतीय आक्रमण हा शिवसेनेचा मुख्य मुद्या आहे. अलीकडेच्या काळात त्यांची भूमिका मवाळ जरी असली तरी मनसेने उभ्या केलेल्या राजकीय आव्हानामुळे आता ती भूमिका त्यांनी आधिक आक्रमक बनवण्याचा प्रयत्न केला आहे. या पार्श्वभुमीवर त्याची ऑस्ट्रेलियन खेळाडूच्या विरोधाची भुमीका विसंगत व विनोदी वाटते. ऑस्ट्रेलीयन सरकारने शिवसेनेला विचारले की आमच्या देशातील काही भुमीपुत्रांच्या न्यायांची भाषा करणारे पण अतिरकी विचाराचे लोक भारतीय लोंकावर हल्ले करतात पण तुम्ही तर तुमच्या देशातील लोकांना विरोध करता प्रसंगी त्यावर हल्ले करता मग तुम्हांला देशभक्तीची भाषा करण्याचा नैतिक आधिकार तो काय? या प्रश्नांचे शिवसेनेकडे उत्तर नाही. शिवसेनेची ही भुमीका कमालीची अंतर्विरोधी असणारी आहे. दुसरे उदाहरण बाबरी मजीदचे आहे.

अशा अंतर्विरोधी भुमिकामुळे शिवसेना दिवसें दिवस खोल गर्तेत ढकलली जात आहे. याचे प्रमुख कारण शिवसेना बदलत्या काळांची पाऊले ओळखण्यास कमी पडत आहे. शिवसेनेला आपली नवीन ओळख निर्माण करावी लागणार आहे. शिवसेनेचे दोन चेहरे आहेत. एक चेहरा संकुचित अस्मीतावादी (प्रांतवादी, हिंदुत्ववादी) राजकारणाचा लोकशाहीचे मुल्ये पायदळी तुडवण्याचा उग्र असा चेहरा आहे. तर दुसरा चेहरा लोभस आहे. तो चेहरा प्रस्थापितांच्या बंडखेरांचा आहे. आणि शिवसनेची बंडखोरी बहुआयामी आहे. त्यात विधायक राजकारण आहे. आणि दिवसें दिवस ही बंडखोरी वाढु लागली आहे. त्यात निर्णायक राजकारण्याची कामना आहे. शिवसेनाचा जन्म जरी मुंबईतील मराठी माणसाच्या असुरक्षितेतुन झालेला असला तरी शिवसेना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात वेगाने वाढलेली आहे. महाराष्ट्रात शिवसेना असा एकमेव पक्ष आहे ज्याने महाराष्ट्रातील जाती राजकारणाला व समीकरणाला धक्का दिला. कार्यकर्त्याच्या जातीपाताचा विचार न करता त्यांना उमेदवारी देण्याची धमक जितकी शिवसेनेने दाखविली तितकी दुसऱ्या कोणत्याही पक्षाने दाखविली नाही. पण जातीय वर्चस्वाला सेनेने धक्का दिला. असा नाही तर वर्गिय वर्चस्वालाही सेनेने धक्का दिला. कमी आधिक ताकत असेल्यामुळे कितीतरी उमेदवार सेनेच्या तिकीटावर निवडून आले. काँग्रेस, राष्ट्रवादी सकटच्या ग्रामीण भागातील सरंजामी घराणेशाहीवादी राजकारणामुळे अस्वस्थ असलेल्या ग्रामीण तरुणाची मोठी ताकद सेनेकडे वळली. त्याचा समर्थनामुळेच सेनेची मुळे ग्रामीण भागात पसरली. पण प्रस्थापित विरोधाचे हे स्फुल्लींग जीवंत ठेवण्यासाठी त्यांना ठोस आर्थिक मुददयांची जोड देण्याची गरज होती पण त्यासाठी आवश्यक असलेली वैचारिकतेची वानवा शिवसेनेकडे राहीली. अभ्यास विचार या अभावा मुळे सेनेकडे नेहमीच उपेक्षेने पाहीले गेले.

१९९० नंतर आर्थिक धोरण घेवून आता जवळ जवळ दोन दशके उलटली. या दोन दशकात देशातिल आर्थिक प्रश्नाचे स्वरुपही बदलेले आहे. खुल्या अर्थव्यवस्थेत शासन व बाजारपेठ (मार्केट) याच्या नव्या नात्याची प्रस्थापना होण्याची गरज आहे. शासनाची भूमिका बाजारपेठेला पुरक असली पाहीजे. तसीच ती बाजारपेठेच्या माध्यमातुन आर्थिक विकास साधण्याच्या साठी गरीबांना सक्षम करणारी असली पाहीजे. नवीन दृष्टीक्षेपात विधायक राजकारण्यांना मोठया सृजनशीलतेची गरज आहे. त्यातुन शिक्षण, आरोग्य ग्रामीण विकास गरीबीचा अन्न सुरक्षा, पायाभुत सेवेची निर्मिती यामधुन निर्माण होतात. नव्या दृष्टीक्षेपामुळे क्रांतीकारक बदल घडून येऊ शकतात दारिद्रय निर्मुलनाचा वेग झपाटयाने वाढु लागतो.

आज ग्रामीण माहाराष्ट्राची कोंडी होत आहे ती मुख्यतः नवीन दृष्टीकोना अभावी राष्ट्रवादी, कॉंग्रेस या संरजामी नेतृत्वाला ही कोंडी फोडण्यात रस नाही. कारण या कुंडीतच त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. शेतीमालाच्या खुल्या व्यापारात अडथळे आणणा-या बाजार समितीवरील या पक्षाचे वर्चस्व हे हितसंबंधाचे उदाहरण आहे. असी असंख्य उदाहरणे ग्रामीण महाराष्ट्रात सापडतील. आपल्या प्रस्थापीत विरोधी बंडखोरी वृत्तीला शिवसेनेने वैचारिकतेची जोड दिली तर ग्रामीण महाराष्ट्राचे राजकारण गुंणात्मक दृष्टया बदलेल. अर्थात मुंबई व इतर काही प्रमुख शहरांमध्ये शिवसेना व इतर पक्ष याच्यांत कांहीच फरक नाही. कारण शिवसेना देखील प्रबळ आर्थिक संबंधाने तितकेच जखडली आहे (उदा. बील्डर्स लॉबी) ७०% ग्रामीण विकासाचे राजकारण विधायकरित्या बदलण्याची उर्जा खऱ्या अर्थाने शिवसेनेकडे आहे. इतर पक्षाच्या तुलनेत शिवसेनेला असलेल्या स्वातंत्र्याचे प्रतिबींब त्याच्या येत्या निवडणुकीतील जाहीरनाम्यामध्ये आढळते. सद्याच्या भ्रष्ट शासन व्यवस्थेच्या जागी गरीबांना आलेल्या अन्नधान्य थेटपणे देण्याचे काम आपल्या जाहीरनाम्यात आणण्याचे धाडस केवळ सेनाच दाखवू शकते. उर्जा आहे पण विचार नाही. उर्जा आहे पण आत्मविश्वास नाही अशी आज सेनेची आवस्था आहे ही कोंडी फोडण्याचा कांहीसा प्रयत्न उध्दव ठाकरे यांनी शेतकऱ्याच्या मेळयाव्याच्या रुपाने केला त्याला यशही आले होते. पण मनसेने उभ्या केलेल्या आव्हानामुळे या आत्मविश्वासाला तडा गेला असा सेना आपल्या मुळ संकुचित, शुध्द राजकारणाकडे परत जाऊ लागली आहे. शाहरुख खानच्या प्रकरणात व सेनेची घेतलेली विषारी जातीयवादी भुमीका पुण्यातील बॉम्बस्फोटा नंतरची असंमजस भुमीका हे याचेच द्योतक आहे.

## निष्कर्ष आणि समारोप

सामाजिक संघटन हे समाजात जीवन जगणा-या व्यक्तिच्या एकात्मिक भावनिष्ठेमधून अभिव्यक्त होणारी प्रक्रिया आहे. समाज व्यवस्थेत एकत्रित जीवन जगणा-या व्यक्तिंचे परस्पर विश्वासपात्र संबंध आणि परस्परांप्रती असणारी आत्मियता यामधून सामाजिक संघटन घडत असते. राजकीय संघटन हे निश्चित अशा राजकीय हेतुने, विशिष्ठ राजकीय विचारपरंपरेच्या मुलगामी सिंध्दातानुसार विचारपुर्वक घडवून आणले जाते. राजकीय संघटन घडवून आण्ण्यासाठी धर्म व धर्मतत्वाचा उपयोग केला जातो. जागतिक पातळीवर उदयास आलेला आणि मानवतावादी जीवनप्रणालीला प्रतिरोध करणारा मुलतत्ववाद हा आज राजकीय संघटन घडवून आणण्यासाठी धर्मवादयांनी स्विकारलेला एक पर्याय आहे. इराणमधील आयातुल्ला खोमेनी यांनी घडवून आणलेली राज्यक्रांती आणि धर्मक्रांती, पाकिस्तानमधीन विविध धार्मीक संघटना आणि त्यांची कार्यपध्दती, ओसामा बिन लादेन याची अलकायदा संघटना आणि तिचे दहशतवादी कृत्य ही काही उदाहरणे धार्मीक मुलतत्ववादाच्या आधारे विकसित करण्यात आलेले राजकीय संघटन. हे वस्तुतः निधर्मी लोकशाहीला आणि मानवी जीवनातील आधुनिकतेला विरोध करणारे संघटन असते.

२० शतकाच्या तीस-या दशकाच्या मध्यापासून भारतीय राजकारणांत हिंदूचे राजकीय संघटन घडवून आणण्याची प्रक्रिया सुरू झाली. स्वा. सावरकर आणि इतर प्रभृती यांनी प्रारंभी सशस्त्र क्रंातीचे राजकारण करून ब्रिटीश सत्तेला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिलेली होती. हिंदूचे राजकीय संघटन हे स्वा. सावरकराचे जीवन उद्यिष्ठ होते. या हेतूनेच त्यांनी १९२४ साली हिंदूत्व या ग्रंथाची निर्मीती केली. या ग्रंथातील मुलभूत विचारसरणीवर अधारीत त्या विचारसरणीला मुर्त स्वरूप देण्याच्या हेतुनेच रा. स्व. संघाची निमलष्करी संघटना डॉ. हेडगेवाराच्या नेतृत्वाखाली निर्माण झाली. स्वातंञ्यपुर्व काळातील स्वा. सावरकराचे हिंदुत्ववादी राजकारण आणी राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे राजकारण सर्वज्ञात आहेच. १९८० नंतरच्या भारतीय राजकारणाचा आढावा घेत असताना भारतीय जनता पक्ष, संघ आणी संघ परिवाराच्या राजकारणाची चिकित्सा केल्यास हिंदूत्ववाद्याना अभिप्रेत असलेल्या हिंदू राष्ट्रवादाचे ध्येय साध्य करता आले आहे काय? संघ आणि संघ परिवारातील विविध संस्थाचे कार्य हे राष्ट्रव्यापी आणी देशव्यापी होवू शकते काय? संघाला अभिप्रेत असणारा हिंदूत्ववाद हा भारतीय समाजातील विशीष्ठ वर्णापुरता आणी त्यांच्या हितसंबंधापर्यंत मर्यादीत राहिलेला आहे. संघाला अभिप्रेत असलेला हिंदू समाज कोणता? भारतीय समाजातील अस्पृश्य, अंत्यज आणी इतर बहूजन समाजाला त्यांना मान्य असलेल्या वर्णीय व्यवस्थेत कोणता सामाजिक दर्जा असणारा असेल? संघाचे सांस्कृतिक कार्य आणी बौध्दिके ही पुज्य गोळवळकर गुरूजीच्या विचारधनाशी संबंधीत आहेत. हे जाणवते. या अनुषंगाने प्रश्न निर्माण होतो तो हिंदूत्ववाद्याना अभिप्रेत असलेल्या हिंदू राष्ट्रवादाचे व हिंदू राष्ट्राचे काय?

वस्तुतः भारताची फाळणी एक दुःखद, युगप्रवर्तक घटना आहे हे मान्य करावे लागेल. राष्ट्र या संकल्पनेचा विचार होत असताना विशिष्ठ भौगोलिक प्रदेशांत कायम वास्तव्य करून राहणारा, एकात्म भावनेने जीवन जगणारा मानवी

समूह आणि मानवी समूहातील प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून केंद्रस्थानी कल्पून त्याला माणसाचे जीवन कसे जगता येईल या आधुनिक विचाराने प्रेरीत झालेला समाज असा विचार करावा लागेल. भारतीय उपखंडातील स्वातंञ्यपुर्व काळातील हिंदू - मुस्लिम राजकारण आणि स्वातंञ्योत्तर भारताचे धर्मनिरपेक्ष राजकारण व ८० च्या दशकानंतर अवतरलेले धार्मिक उन्मादाचे राजकारण भारतीय राष्ट्रवादाला, राष्ट्रवादाच्या जडणघडणीला कसे हानीकारक ठरलेले आहे, हे काळाने सिध्द केलेले आहे.

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १ | स्त्रोत | रावसाहेब कसबे - पृ. ०९. |
| २ | शिवराञ | नरहर कुरूंदकर - पृ. ३७ - ५६. |
| ३ | विचारधन | पृ. १६. |
| ४ | विचारधन | पृ. ५४. |
| ५ | विचारधन | पृ. ५४. |
| ६ | विचारधन | पृ. ६७. |
| ७ | विचारधन | पृ. ८. |
| ८ | श्री. गुरूजी समग्र दर्शन | (भारतीय विचारधारा नागपूर १९०५ खं्ड - ५ पृ. ७५). |
| ९ | हेडगेवार | ना. ह. पालकर (प्रकाशन १९६०). |
| १० | वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ | पृ. ५१. |